जनसंपर्क कक्ष
23 JUL 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘स्मृतितरंग’चे मंगळवारी प्रकाशन

## ज्येष्ठ अवकाश संशोधक डॉ. आर. व्ही. भोसले यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्येष्ठ अवकाश संशोधक डॉ. आर. व्ही. भोसले यांच्या जीवनावर आधारित ‘स्मृतितरंग’ चरित्रात्मक पुस्तकाचे प्रकाशन मंगळवार २४ रोजी होणार आहे. पी. टी. पाटील लिखित पुस्तक प्रकाशन सोहळा मंगळवारी दुपारी ४ वाजता राजारामपुरीतील साईक्स एक्स्टेंशन जवळील महालक्ष्मी सांस्कृतिक हॉलमध्ये कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून डॉ. भोसले यांचा जीवनप्रवास, संशोधन आणि त्यांच्या संपर्कात आलेले नोबेल पारितोषिक विजेते संशोधक यांची माहिती देण्यात आली आहे, अशी माहिती ज्येष्ठ अवकाश संशोधक डॉ. आर. व्ही. भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, अवकाश संशोधन करताना मला स्वतंत्र लेखन करता आले नाही. तसेच अध्यापन करण्याची इच्छा होती म्हणून सेवानिवृत्तीनंतर शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसाठी स्पेस सायन्स अभ्यासक्रम तयार केला. त्यानंतर विनामूल्य अध्यापनही केले. आज या विषयाचे विद्यार्थी संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. स्मृतितरंग पुस्तकाच्या माध्यामातून माझे अनुभव मांडले आहेत. या पुस्तकात परदेशातील नोबेल पुरस्कार विजेत्या संशोधकांबरोबर मला आलेले अनुभव, मी केलेले संशोधन, त्याचा समाजाला झालेला उपयोग, भारतातील अवकाश संशोधनातील प्रगती याचा वृतांत या चरित्रात करण्यात आला आहे. यावेळी डॉ. सुभाष देसाई, कुंभी कासारी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी. डी. पाटील, विजयाताई भोसले, विश्वास काटकर, पंडीत कंदले आदी उपस्थित होते.

**डॉ. भोसले यांचे योगदान**



- कॅनडा येथे पोस्ट डॉक्टरेट करताना सोलर रेडिओ टेलिस्कोप तयार केला.
- भारतातील पहिला रेडिओ टेलिस्कोप बनवला.
- शिवाजी विद्यापीठात अवकाश संशोधन अभ्यासक्रम बनवून विनामूल्य अध्यापन.
- पन्हाळा येथे अवकाश संशोधन केंद्राची स्थापना करण्यासाठी मोठे योगदान.

### सर्वच कॉलेजमध्ये स्पेस सायन्स विषय पदवीपासून असावा

माझ्या मार्गदर्शनाखाली राजाराम कॉलेजमध्ये तत्कालीन प्राचार्य डॉ. वसंत हेळवी यांनी पदवी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी स्पेस सायन्स अभ्यासक्रम तयार केला. त्यामुळे इतर महाविद्यालयांनीही राजाराम कॉलेजप्रमाणे स्पेस सायन्स विषयाचा अभ्यासक्रम सुरू करावा, असे आवाहन डॉ. भोसले यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUL 2018
महाराष्ट्र टाईम्स

# खगोलशास्त्रज्ञाचा संशोधनप्रवास पुस्तकरुपात

**म. टा. प्रतिनिधी**, कोल्हापूर

'भारतात पहिला रेडिओ टेलिस्कोप तयार करणारे, अवकाश व खगोलक्षेत्रात जागतिक पातळीवरचे संशोधन करणाऱ्या आंतरराष्ट्रीय किर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. आर. व्ही. भोसले यांचा संशोधन प्रवास पुस्तकरुपांनी उलगडणार आहे. त्यांच्या आजवरच्या वाटचालीवर आधारित 'स्मृतितरंग' या पुस्तकाची निर्मिती केली आहे. त्यांच्या खगोल व अवकाशक्षेत्रातील संशोधनाची ओळख घडेल. मंगळवारी (ता. २४) पुस्तकाचा प्रकाशन समारंभ आयोजित केला आहे.




कागल तालुक्यातील बस्तवडेसारख्या ग्रामीण भागापासून ते आंतरराष्ट्रीय पातळीवरील शास्त्रज्ञापर्यंतचा प्रवास हा नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरावा, हा पुस्तक निर्मितीमागील उद्देश असल्याचे कुंभी-कासारी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी. टी. पाटील यांनी सांगितले. पाटील यांनी 'स्मृतितरंग' पुस्तकाचे शब्दांकन केले आहे. साइक्स एक्टेंशन परिसरातील जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेच्या महालक्ष्मी सभागृहात सायंकाळी ४.३० वाजता पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विद्यापीठातील नॅनो टेक्नॉलॉजीचे डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत पुस्तक प्रकाशन होईल.

**डॉ. आर. व्ही. भोसले यांच्या 'स्मृतितरंग'चे मंगळवारी प्रकाशन**

यावेळी विश्वास काटकर, डॉ. सुभाष देसाई, पंडीत कंदले, विजया भोसले उपस्थित होते.

23 JUL 2018 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिस्टन्स एज्युकेशनकडे वाढला कल

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

नोकरी किंवा व्यवसाय करत शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करता यावे यासाठी कार्यरत असलेल्या शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण विभागातील अभ्यासक्रमात यंदा अकरा नव्या अभ्यासकेंद्रांना मान्यता मिळाली आहे. यामुळे पारंपरिक अभ्यासक्रमांशिवाय कौशल्यविकासावर आधारीत अभ्यासक्रमातून करिअरला व्यापकता देण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी या विभागात प्रवेशासाठी वाढता प्रतिसाद आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रवेश घेण्याची मुदत असल्यामुळे सध्या या विभागात विद्यार्थ्यांची लगबग सुरू आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामार्फत पदवी व पदव्युत्तर विषयाच्या प्रवेशाची प्रक्रिया १९ जुलैपासून सुरू झाली आहे. यासाठी ऑनलाईन अर्ज www.unshivaji.ac.in या वेबसाईटवर Distance Education या लिंकवर उपलब्ध करण्यात आला आहे. दूर शिक्षण केंद्राच्यावतीने सुरू असलेल्या प्रवेशप्रक्रियेत बी.ए, बी.कॉम, एम.ए, (भाषा/सामाजिकशास्त्र) एम. ए. जैनॉलॉजी आणि प्राकृत, लोकप्रशासन, एम.कॉम, एम.एस्सी. (गणित), पी.जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.



**यंदा ११ नव्या अभ्यासकेंद्रांना मिळाली मान्यता**

केंद्रीय मानव संसाधन मंत्रालयाच्यावतीने मोफत स्वयम कोर्सेस सुरू करण्यात आले असून 'कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी इन एज्युकेशन' चा अभ्यासक्रमासाठी नाव नोंदणी करण्यात येत आहे.

यंदापासून लोकशाही सुशासन हा नवा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. प्रशासकीय सेवेत नोकरी करत असलेल्यांसाठी दूरशिक्षणच्या माध्यमातून या कोर्सची उपयुक्तता वाढली आहे. तसेच संवादशास्त्रातील संधी लक्षात घेऊन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी इन एज्युकेशन या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची पसंती यंदा चांगली आहे. भाषाशास्त्रात जैनॉलॉजी याविषयाची पदवी घेण्याकडेही यंदा कल वाढला असून यामुळे संशोधनामध्ये स्वारस्य असलेल्या नोकरदारांसाठी हा विषय पूरक ठरणार आहे. भाषांतराच्या क्षेत्रातील संधी खुणावत असल्यामुळे ट्रान्सलेशन विषयातील पदविकाही दूरशिक्षण विभागामध्ये उपलब्ध करण्यात आली आहे.

## असा भरा अर्ज

- अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन रजिस्ट्रेशन करावे
- रजिस्ट्रेशनसाठी विद्यार्थ्यांनी पीआरएन नंबरचा वापर करावा
- ज्या विषयांचे स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध आहे असे विषय निवडावेत
- अर्ज ऑनलाइन भरून प्रिंटवर स्वाक्षरी करून सोबत गुणपत्रिकेच्या छायाप्रतीसह अभ्यासकेंद्रावर जमा करावी
- आवश्यक दाखल्यांसोबत ट्रान्सफर सर्टिफिकेट, लिव्हिंग सर्टिफिकेट, मायग्रेशन सर्टिफिकेट एक महिन्याच्या मुदतीत सादर करावे
- आवश्यक कागदपत्रे
- बँकेच्या खात्याची माहिती, आयएफएससी कोड, खातेक्रमांक यांसह आधारकार्ड, मतदान ओळखपत्र हवे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JUL 2018
कुमारक्रांती

# मोतीबाग तालमीच्या मल्लविद्येने तैवानचे शिष्टमंडळ प्रभावित

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठात क्रीडाविषय माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी तैवान येथून आलेल्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या शिष्टमंडळाने कोल्हापुरातील मंगळवार पेठ येथील मोतीबाग तालमीस भेट दिली. यावेळी पैलवानांनी दाखविलेली



क्रीडा विभागाचे अधिकारी प्रा. सिअँग

लियू, प्रा. ह्युअॅग यू हे अत्यंत प्रभावीत झाले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. नांदवडेकर तसेच जिल्हा तालीम संघाचे प्रतिनिधी महादेवराव आडगुळे, संभाजी वरुटे, पैलवान संभाजी पाटील, हिंदकेसरी दिनानाथसिंह, दादू चौगुले, विनोद चौगुले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरूण भारत
23 JUL 2018

# दूरशिक्षण केंद्राच्या प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातर्फे पदवी–पदव्युत्तरच्या प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. या प्रवेशाची माहिती व ऑनलाइन अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दूरशिक्षण केंद्राच्या वतीने सुरू असलेल्या प्रवेश प्रक्रियेत बी.ए., बी.कॉम., एम. ए. (भाषा सामाजिकशास्त्र) आणि प्रकृती, लोकप्रशासन, एम. कॉम., एम. एस्सी., (गणित), पी. जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन या अभ्यासक्रमाचा समावेश आहे. प्रवेश प्रक्रिया व्दितीय व तृतीय नियमित पुनर्परिक्षार्थी यांच्यासाठी आहे, अशी माहिती उपकुलसचिव कॅप्टन डॉ. नितीन सोनजे यांनी दिली.

**उपकुलसचिव डॉ. कॅप्टन नितीन सोनजे यांची माहिती**

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ७७ अभ्यास केंद्रांच्या आयोजित प्रवेश प्रक्रिया कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे होते.

डॉ. सोनजे म्हणाले, नियमित शुल्कासह ४ ऑगस्टपर्यंत विलंब शुल्कासह १० ऑगस्टपर्यंत तर १६ ऑगस्टपर्यंत अतिविलंब शुल्कासह अर्ज भरावयाची मुदत आहे. या कार्यशाळेमध्ये कोअर सॉफ्टवेअरचे इंजिनिअर सुभाष कोकरे, वित्त व लेखाधिकारी विभागाचे प्रमुख प्रमोद पेठकर यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUL 2018
Times of India

# 7 candidates from DKTE selected for higher education

Times News Network

Seven students, who recently passed out from DKTE society's Textile and Engineering Institute, Ichalkaranji, have been selected to pursue MS at world renowned universities in the USA, Sweden, Netherlands and Germany, said officials from the college.

According to the college officials, the selected students cracked the qualifying tests which are pre-requisites for pursuing higher education in foreign universities. They cracked exams such as GRE, TOEFL and IELTS. The students had to undergo linguistic training for foreign languages like German as well.

Professor J M Patil guided students in qualifying in the aforesaid tests and in acquiring foreign language skills. The students were felicitated by DKTE officials.



The students who have been selected for higher education in foreign universities being felicitated by DKTE officials

## CAMPUS BUZZ

**SUK invites applications for PG diploma in E-business:** Shivaji University, Kolhapur (SUK) has invited applications for the PG diploma in E-business by August 6. The sale of forms will begin from July 24.

The admission notice from the university stated, "The Department of Commerce and Management (MBA Unit), SUK will start a new course 'PG diploma in E-business' from the academic year 2018-19. The classes will be conducted in Department of Commerce and Management from August 2018. The duration of the course is one year with an intake of 60 students."

According to the notice, the fee of the said course is Rs 5,000 and admission is strictly based on first-come, first-serve.

**Fisheries workshop at SUK:** Shivaji University, Kolhapur's (SUK) zoology department in association with College of Fisheries, Girgaon, Ratnagiri has organised a workshop for the breeding of the decorative fishes from July 23 to July 28 at the university campus.

# ग्रंथालय विभागातर्फे उद्यापासून कार्यशाळा

**कोल्हापूर :** बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या ५५ व्या वर्षाचे औचित्य साधून २४ ते २९ दरम्यान राष्ट्रीय कार्यशाळा होत आहे. विद्यापीठ व इन्फ्लीबनेट सेंटर गांधीनगरतर्फे कार्यशाळा आयोजित केली आहे. कार्यशाळा ग्रंथपालांसाठी आहे. कार्यशाळेचा मुख्य हेतू डीस्पेस या संगणक प्रणालीचा वापर करून संस्थेअंतर्गत रिपॉजिटरी तयार करणे व इन्फ्लीबनेटने विकसित केलेल्या सोल 2.0 ग्रंथालय संगणकीकरण प्रणालीचा वापर करून ग्रंथालय संगणकीकरण करणे, असा आहे. कार्यशाळेचा लाभ ग्रंथपालांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. एन. बी. खोत व डॉ. शालिनी लिहितकर यांनी केले आहे.

## तंत्रज्ञान विभागात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व इलिक्सर कन्सल्टंटस यांच्यातील सामंजस्य करारांतर्गत तंत्रज्ञान अधिविभागात 'प्रोसेस डिझाईन ऑफ पॉवर प्लांट' विषयावर दोनदिवसीय कार्यशाळा झाली. स्कॉटलंडस्थित केमिकल इंजिनिअर विश्वास शिंदे प्रमुख पाहुणे होते. श्री. शिंदे यांनी केमिकल व मेकॅनिकच्या बी. टेक. विद्यार्थ्यांना ऊर्जानिर्मिती क्षेत्रात प्रक्रिया संरचनेबाबत मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील मुलांनी आपापल्या अभ्यासशाखेत झोकून देऊन अभ्यास केल्यास त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मागणी असल्याचे सांगितले. आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करताना आवश्यक कौशल्ये कशी आत्मसात करावीत, याची माहितीही त्यांनी दिली. संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी, डॉ. प्रवीणकुमार पाटील उपस्थित होते. केमिकल टेक्नॉलॉजी विभागाचे प्रा. डी. एम. नांगरे, प्रा. एस. एम. गायकवाड यांनी संयोजन केले.